<u>नि. फौ. ख. क्र.५०/२०१८</u> निशाणी ३६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – श्रीकृष्ण नारायण डांगे

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

पत्ता – रा. हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी सन २०१३ ते २०१८ या कालावधीमध्ये पो.स्टे. उरळ येथे हे.कॉ. या पदावर कार्यरत होतो. दि.०६.०४.२०१७ रोजी मी कर्तव्यावर कार्यरत असताना माझ्याकडे पो.स्टे. उरळ येथे नोंद झालेला अप क्र.७६/२०१७, भादंवि कलम ३७९ याचा तपास वरीष्ठांच्या आदेशाने वर्ग करण्यात आला होता. सदर तपासकामी माझ्याकडे प्रथम खबरी अहवाल, जबानी रिपोर्ट, घटनास्थळ पंचनामा इ. प्राप्त झाले होते. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, फिर्यादी नामे हिम्मत वानखडे याने सदरची फिर्याद त्याचे दोन बैल दि.२४.०३.२०१७ रोजी त्याच्या घरा समोरुन अज्ञात इसमाने चोरी केल्याबाबतचे दाखल केलेले आहे.

२. सदर तपासामध्ये आरोपीचा शोध घेतला. त्या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडून आम्हाला माहिती दिली की, आरोपी याच्याकडून १०५ बैलांचे कातडे हस्तगत केलेले आहे. त्याप्रमाणे आम्ही फिर्यादीस सुचना दिली व त्यास आम्ही स्थानिक गुन्हे शाखा, अकोला येथील कार्यालयात घेवून गेलो. फिर्यादी याने हस्तगत केलेल्या बैलांची कातड्याची पाहणी केली असता त्यामधील दोन बैलाची कातडे त्याने त्याच्या बैलाचे असल्याबाबत ओळखले. त्याप्रमाणे मी दोन पंचांसमक्ष सदर दोन बैलांच्या कातड्याचा मालमत्ता व ओळख पंचनामा तयार केला. आता मला सदर मालमत्ता व ओळख पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी, फिर्यादीची व दोन पंचांची सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे.

३. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये साक्षीदार यांचे पुरवणी जबाब नोंद केले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेकडून त्यांनी जप्त केलेल्या मालाची मालमत्ता पत्रक घेतले. तसेच आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेल्या मुद्देमालाचा जप्ती पंचनाम्याची मुळ प्रत माझ्या ताब्यात घेतली. सदर पंचनाम्यामध्ये कातडी क्र.२ व ९ वर फिर्यादी याच्या बैलाची कातडी असल्याबाबत नमुद आहे. सदर तपासामध्ये आरोपीचा सदर गुन्ह्यामध्ये सहभाग निष्पन्न झाल्याने आरोपीस न्यायालयीन प्रक्रियेद्वारे सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने अटक केली. आता मला फौ.प्र.सं. कलम ४१–ब ची माझ्या सहीची नोटीस दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येत आहे. तसेच आरोपीचा अटक फॉर्म दाखविण्यात आला त्यावर माझी व एक पंचाची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे. सदर तपासामध्ये आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात त्याच्या विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाची स्थानिक गुन्हे शाखा यांनी कायदेशिर विल्हेवाट लावली.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. फिरोजखान यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. फिर्यादी याच्या मालकीचे दोन बैल असल्याबाबत त्याच्या गावातील सरपंच, कोतवाल व तंटा मुक्ती अध्यक्ष यांच्याकडे चौकशी करुन मी त्यांचा जबाब नोंद केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर तपासामध्ये फिर्यादी हा कोणत्या ठिकाणी राहतो याबाबतचे कागदपत्र प्राप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी याच्या बैलाची चोरी झाल्याबाबत मी कोणतीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्थानिक गुन्हे शाखा यांनी जप्त केलेल्या बैलांच्या कातडाचे रंगा सारखे दिसणारे इतर बैलांचे कातडे असतात. सदरची घटना ही दि.२४.०३.२०१७ रोजी घडली होती व सदर घटनेची फिर्यादी दि.०६.०४.२०१७ रोजी दिली होती, सदरच्या फिर्यादीस विलंब का झाला होता, याबाबत मी त्यास विचारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्षात घटनास्थळी जावून तेथे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्षात घटनास्थळी जावून तेथे चौकशी केली, याबाबतचे कागदपत्र दोषारोप पत्रासोबत जोडलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही

की, मी घटनास्थळावर गेलो नाही, म्हणून कोणतेही दस्तऐवज दोषारोप पत्र सोबत जोडलेले नाहीत.

५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या ताब्यातून तथाकथित मिळून आलेल्या फिर्यादी यांच्या चोरी गेलेल्या बैलांच्या कातडीचा जप्ती पंचनामा मी स्वतंत्रपणे केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर तपासामध्ये पोलीस उपनिरीक्षक ममता बादे यांचा जबाब नोंद केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०६.०४.२०१७ ते दि.२९.११.२०१७ या कालावधीमध्ये मी कोणताही तपास केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.०६.०४.२०१७ ते दि.२९.११.२०१७ या कालावधीमध्ये का तपास केला नाही, त्याचे कारण देखील दोषारोप पत्र सोबत जोडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ज्या ठिकाणी ज्या गावामध्ये राहतो त्याचा मी तपास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणामध्ये मी योग्य तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मालमत्ता ओळख पंचनामा करणेकरीता पंचांना लेखी नोटीस दिलेली नव्हती, तसेच सदर पंचनामा हा पो.स्टे.मध्येच तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १४.१०.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.10.14 17:16:24 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १४/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १४/१०/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १४/१०/२०२५ |